Exh-43

घोडेगाव पोलीस स्टेशन
जावक क्रमांक ३२०९ / २०२६
दिनांक ०३/०७/२०२६

प्रति,

मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो,
न्यायालय घोडेगाव ता. आंबेगाव जि. पुणे,
यांना सविनय सादर,

रिपोर्ट :– एम.एस.पवार, पोलीस उपनिरीक्षक घोडेगाव पोलीस स्टेशन
यांजकडुन विनंती पुर्वक की,

विषय :– मुददेमाल (सोन्याची चैन)ताब्यात देणेबाबत ....

संदर्भ फौ.कि.अर्ज. नं ४२/२०२६

————————————————————oooo————————————————————

महोदय ,

| | | | |
|---|---|---|---|
| १) | पोलीस स्टेशन | :– | घोडेगाव जिल्हा :–पुणे ग्रामीण |
| २) | गु.र.नं. व कलम | :– | ५०/२०२६ भा.न्या.संहिता २०२३ चे कलम ६१(२),३०९(४),३११, ३३२(बी) |
| ३) | फिर्यादी | :– | रमेश विष्णु अभंग वय ७८ वर्षे, व्यवसाय शेती रा.गिरवली कृष्णवाडी, ता. आंबेगाव जि. पुणे मो नं. ७३७८७२८०३५ |
| ४) | आरोपी | :– | **कबिर उंबऱ्या काळे वय.२४ वर्षे रा.सुरेगाव ता.श्रीगोंदा जि.अहिल्यानगर** यातील याला **आज दिनांक ०२/०५/२०२६ रोजी १२/२८** वाजता **मा.सवौच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करून अटक करण्यात** आलेली **आहे.** |
| ५) | विधी संघर्षीत बालक | :– | कुणाल अनिल भोसले वय अंदाजे १२ वर्षे रा. सुरेगाव ता.श्रीगोंदा जिल्हा अहिल्यानगर |
| ६) | गु.घ.ठिकाण | :– | मौजे गिरवली कृष्णवाडी ता आंबेगाव जि पुणे येथे फिर्यादीचे राहते घरात |
| ७) | गु.घ.ता.वेळ | :– | दिनांक २७/०३/२०२६ रोजी रात्रौ ०२/०० वा.चे सुमारास |
| ८) | गु.दा.ता.वेळ | :– | दिनांक २७/०३/२०२६ रोजी ०६:०२ वाजता |
| ९) | चोरीस गेलामाल | :– | १) ३०,००० /– रु.किमतीचे कानातील दोन सोन्याचे टॉप्स ३ ग्रॅम वजनाचे जु.वा.कि.अं.<br>२) ६०,०००/– रु किमतीचे एक बदामाचे पानाचे आकाराचे सोन्याचे डोरले त्यात सोन्याचे मणी असलेले ९ ग्रॅम वजनाचे जु.वा.किं.अं.<br>३) ८५४०/– रु रोख रक्कम त्यात पाचशे रुपये दराच्या सतरा चलणी नोटा, विस रुपये दराच्या दोन चलणी नोटा<br>४) २००/– रुपये किंमतीच्या तिन लोखंडी कुऱ्हाडी व एक लोखंडी कोयता जु.वा.कि.अं<br>एकुण ९८,७४०/– रु येणेप्रमाणे किमतीचे वरील वर्णनाचे सोन्याचे दागिने |
| १०) | मिळाला माल | :– | **२) २५,०००/— रु किंमतीचे २.५ ग्रॅम वजनाचे कानातील दोन सोन्याचे टॉप्स जु.वा.कि.अं**<br>एकुण २५,०००/–रु येणेप्रमाणे किमतीचे वरील वर्णनाचे सोन्याचे दागिने |

Seen & filed
9-7-26
JMFC

११)<u>हकीकत</u> :– वर नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणी कोणीतरी अज्ञात इसमानी जबरी चोरी करण्याचा कट करुन फिर्यादी यांचे राहते घरी घराचे किचनच्या खिडकीच्या खालील बाजुच्या भिंतीच्या विटा काढुन भिंत फोडुन घरामध्ये प्रवेश करुन फिर्यादीच्या पत्नीच्या कानातील व गळ्यातील सोन्याचे दागीने हिसकावुन घेवुन कोयत्याचा धाक दाखवुन वरील वर्णनाचा रोख रक्कम व सोन्याचे दागीने व वस्तु जबरी चोरी करुन घेवुन गेले आहेत. म्हणुन अज्ञात इसमांविरुद्ध कायदेशीर तक्रार आहे.वगैरे मजकुराचे फिर्यादीवरुन गुन्हा रजिस्टरी दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास आम्ही करीत आहोत.

सदर अटक आरोपी हा मंचर पोलीस स्टेशन गु.र.नं. ८८/२०२६ भा.न्या.सं.कलम १०३(१),३३१,३(५) मध्ये अटकेत असताना त्याने त्याचे इतर साथीदारांनी घोडेगाव पोलीस स्टेशन गु.र.नं.४२/२०२६ भा.न्या.संहिता २०२३ चे कलम ६१(२),३०९(४),३११,३३२(बी), ३१०(२),११५(२),३५१(२)हा गुन्हा केला असल्याची कबुली दिली असुन तांत्रिक विश्लेषणाचे आधारे तसे निष्पन्न झाल्याबाबत पोलीस निरीक्षक मंचर पोलीस स्टेशन यांनी बिनतारी संदेशाने कळविल्याने सदर अटक आरोपीस मा.न्यायालयाचे प्रोडक्शन वॉरंटाने मध्यवर्ती कारागृह येरवडा पुणे येथुन ताब्यात घेवुन घोडेगाव पोलीस स्टेशन गु.र.नं.४२/२०२६ भा.न्या.संहिता २०२३ चे कलम ६१(२),३०९(४),३११,३३२(बी), ३१०(२),११५(२),३५१(२) मध्ये अटक केले होते.सदर गुन्हयात अटक असताना अटक कालावधीत गुन्हयातील अटक आरोपी घोडेगाव पोलीस स्टेशन गु.र.नं.५०/२०२६ भा.न्या. संहिता २०२३ चे कलम ६१(२),३०९(४),३११,३३२(बी) हा गुन्हा त्याचा साथीदार विधी संघर्षीत बालकाचेसह केला असल्याची कबुली दिली असुन सदर अटक आरोपीकडुन सदर गुन्हयातील चोरीस गेले माला पैकी कॉलम नंबर १० मध्ये नमुद केलेला माल गु.र.नं.४२/२०२६ मध्ये अटकेत असताना मेमोरंडम पंचनाम्याने जप्त करण्यात आला आहे.त्याची ओळख पटविण्यात आली आहे.

तरी योग्य अटी व शर्तींवर यातील अर्जदार यांना त्यांचा मुददेमाल (कानातील दोन सोन्याचे टॉप्स) ताब्यात देण्यास काही एक हरकत नाही.

मा.सविनय सादर

(एम.एस.पवार)
पोलीस उपनिरीक्षक
घोडेगाव,पोलीस स्टेशन

मार्फत सविनय सादर
मा. सहाय्यक पोलीस निरीक्षक सो
घोडेगाव, पोलीस स्टेशन

दाखल व पाहुन सादर

सहा. पोलीस निरीक्षक
घोडेगाव पोलीस स्टेशन